पुढारी




वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये कार्यशाळेदरम्यान उपस्थित प्रा. श्रीरंग जोशी, डॉ. प्रभात मिश्रा, प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा प्रा. वंदना पत्रावळे आदी.

# औषध क्षेत्रामध्ये आणखी संशोधनाची गरज : डॉ. मिश्रा

## कोरे फार्मसीत प्रगत औषध तंत्रज्ञानावर कार्यशाळा

**वारणानगर : प्रतिनिधी**

औद्योगिक, शैक्षणिक संस्थांतील व्यक्तींनी एकत्रित येऊन औषध क्षेत्रातील संशोधनाचे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सीडीआरआयचे प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभात मिश्रा यांनी केले.

येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये पंडित मदन मोहन मालवीय नॅशनल मिशन ऑन टीचर्स अँड टीचिंग योजनेंतर्गत एमएचआरडी भारत सरकार यांच्याद्वारे इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई यांच्या वतीने औद्योगिक फार्मसी या विषयावरील १० दिवसांची कार्यशाळा पार पडली.

वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्रा. विकास तेलवेकर व डॉ. जॉन डिसोझा उपस्थित होते. कार्यशाळेसाठी आयसीटीचे प्रा. पी. आर. व्हाविया, प्रा. वंदना पत्रावळे, डॉ. श्रीरजनी पुलाक्कात, प्रा. श्रीरंग जोशी, प्रा. आनंद पटवर्धन यांच्यासह नामांकित ३२ तज्ज्ञ मार्गदर्शक सहभागी झाले होते.

प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा यांनी स्वागत केले. प्रा. शलाका पत्की व प्रा. सायली पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले

सकाळ




**वारणानगर : येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये कार्यशाळेप्रसंगी प्रा. श्रीरंग जोशी, डॉ. प्रभात जोशी, प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, प्रा. वंदना पत्रावळे.**

# औषध क्षेत्रात संशोधन होण्याची गरज : डॉ. मिश्रा

## तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीत १० दिवसीय कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. २६ :'औद्योगिक, शैक्षणिक संस्थांतील व्यक्तींनी एकत्रित येऊन औषध क्षेत्रातील संशोधनाचे काम करण्याची गरज आहे,' असे मत सीडीआरआयचे प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभात मिश्रा यांनी व्यक्त केले.

येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये पंडित मदन मोहन मालवीय नॅशनल मिशन ऑन टीचर्स अँड टीचिंग योजनेंतर्गत एमएचआरडी भारत सरकार यांच्याद्वारे इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईतर्फे औद्योगिक फार्मसी या विषयावरील १० दिवसांची कार्यशाळा झाली

उद्घाटन शास्त्रज्ञ डॉ. मिश्रा यांच्या हस्ते, वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी वासंती रासम, प्रा. विकास तेलवेकर, फार्मसीचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा आदींच्या उपस्थितीत झाले. डॉ. रासम यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये रुसा पुरस्कृत कार्यशाळेचे महत्त्व सांगितले. कार्यशाळेत आई.सि.टी.चे प्रा.पी. आर. व्हाविया, प्रा.वंदना पत्रावळे, डॉ.श्रीरजनी पुलाक्कात, प्रा. श्रीरंग जोशी, प्रा. आनंद पटवर्धन तसेच देशातील नामांकित शैक्षणिक व औद्योगिक संस्थांमधून ३२ तज्ज्ञ मार्गदर्शक सहभागी झाले होते.

सहसमन्वयक प्रा. किरण पाटील, डॉ. मंज्जापा यांच्या मार्गदर्शनाखाली अल्ताफ शेख, विशाल खरात तसेच फार्मसीच्या प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. शलाका पत्की, प्रा.सायली पवार यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Kolhapur-Today
27/12/2019 Page No. 11

लोकमत



तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रगत औषध तंत्रज्ञानावर दहा दिवसांची कार्यशाळा पार पडली. यावेळी प्रा. श्रीरंग जोशी, डॉ. प्रभात जोशी, प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, प्रा. वंदना पत्रावळे, तसेच राज्यभरातून फार्मसी, औषध क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

# औषध निर्माण क्षेत्रात संशोधनास प्राधान्य द्या

## प्रभात मिश्रा : कोरे फार्मसीत प्रगत औषध तंत्रज्ञानावर दहा दिवसांची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

वारणानगर : औद्योगिक, शैक्षणिक संस्थांतील व्यक्तींनी एकत्रित येऊन औषध क्षेत्रातील संशोधनाचे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सीडीआरआयचे प्रमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभात मिश्रा यांनी केले.

येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये पंडित मदन मोहन मालवीय नॅशनल मिशन ऑन टीचर्स अँड टीचिंग योजनेंतर्गत एमएचआरडी भारत सरकार यांच्याद्वारे इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई यांच्यावतीने 'औद्योगिक फार्मसी' या विषयावरील १० दिवसांची कार्यशाळा वारणानगर येथे पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन शास्त्रज्ञ डॉ. प्रभात मिश्रा यांच्या हस्ते व वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्रा. विकास तेलवेकर व फार्मसीचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

कार्यशाळेसाठी आय.सी.टी.चे प्रा. पी. आर. व्हाविया, प्रा. वंदना पत्रावळे, डॉ. श्रीरजनी पुलाक्कात, प्रा. श्रीरंग जोशी, प्रा. आनंद पटवर्धन, तसेच देशातील नामांकित शैक्षणिक व औद्योगिक संस्थांमधून ३२ तज्ज्ञ मार्गदर्शक सहभागी झाले होते.